देशोन्नती

# आदर्श इंग्लिश स्कूल येथे सायबर गुन्हा, सुरक्षा कार्यशाळा!

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ▪ स्थानिक डाबकी रोडस्थित आदर्श इंग्लिश स्कूल येथे ९ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हा व सुरक्षा या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. क्विक हिल फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांचे सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित केली होती. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय येथून शीतल फंदाट व वैभवी गंगावते यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका उल्का घोटकर व मार्गदर्शक सुमंत पारसकर यांची उपस्थिती होती. सायबर गुन्हा हा गेमिंगॲप, ऑनलाइन मेसेजेस, ओटीपी पासवर्ड यांचे माध्यमातून कसे होत आहेत. याबाबत सविस्तर माहिती दिल्या गेली तसेच यापासून आपण सुरक्षित कसे राहावे यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. आजकाल अशाप्रकारे फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात होत असल्याने ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त होती, असे विचार शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी व्यक्त केलेत. अशाप्रकारे आणखी कार्यशाळा अकोला शहरासाठी घेतल्याने आपण सायबर गुन्हा प्रमाण कमी करू शकतो व आपला आर्थिक व मानसिक त्रासापासून बचाव करू शकतो, असे विचार सुमंत पारसकर यांनी व्यक्त केले. कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येत विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका यांचे सहकार्य मिळाले.

Akola Edition
9 October 2023 Page No. 4
epaper.deshonnati.com